नि/१३

उपआयुक्त (ज) कार्यालय
सेवकवर्ग विभाग पुणे मनपा
जा.क्र.से/ ११७६
दिनांक १२/६/२०१३

मा.महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर..

विषय :- ''फार्मासिस्ट ''वर्ग - क या पदाच्या रिक्त जागांवरील नेमणुकी बाबत.

संदर्भ :- जाहिरात क्रमांक जाहिरात क्र.१/६९, दि.१६/०५/२०१२ ,दै.सकाळ दि.१६/०५/२०१२

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील **''फार्मासिस्ट ''वर्ग - क** (पे बँड रु. **५२०० ते २०२०० + ग्रेड पे रु.२८०० +** मान्य भत्ते) या हुद्याची पूर्वीची ७५ शेड्युलमान्य पदे आहेत. शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१०/८४४/प्र.क्र.३६४/नवि-२२,मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दि.१६ एप्रिल २०१२नुसार १० नवनिर्मित पदांना मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार एकूण ८५ शेडयुलमान्य पदे आहेत. नवनिर्मित १० पदांसाठी (निवडयादी अजा-१, अज -१, भजड -१, इमाव-२, खुला-५, पैकी १ पद चलनवलन विषयक विकलांगता असणाऱ्या उमेदवारांसाठी राखीव) दि.१६/०५/२०१२ रोजी दै. सकाळ वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसृत करण्यात आली होती. तसेच सेवायोजन कार्यालयाकडून नावे कळविण्यात आलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले. त्यानुसार एकूण ७६५ अर्ज प्राप्त झाले. प्राप्त ७६५ अर्जांची छाननी आरोग्य कार्यालयाकडून केली असता ३४३ अर्ज पात्र व ४२२ अर्ज शैक्षणिक पात्रता व अनुभव नसल्याने अपात्र ठरविण्यात आले.

दि.१९ ऑक्टोबर,२००७ चे शासन निर्णयातील नियम क्र.५(२) नुसार संबंधित सर्व पात्र उमेदवारांची ९० गुणांची लेखी परिक्षा दि. २४/०२/२०१३ रोजी घेण्यात आली. सदर परिक्षेस एकूण २३२ उमेदवार उपस्थित व १११ उमेदवार अनुपस्थित होते.

लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. गुणानुक्रमे गटनिहायं अजा गटांतील १ जागेसाठी आवश्यक उमेदवार **५**, अज गटातील १ जागेसाठी आवश्यक उमेदवार ५ परंतु गुणवत्तायादीनुसार एकही उमेदवार उपलब्ध नाही. भजड गटातील १ जागेसाठी आवश्यक उमेदवार ५ परंतु उपलब्ध उमेदवार **४**, इमाव गटातील ३ जागेसाठी आवश्यक उमेदवार १५ परंतु समान गुण प्राप्त झाल्याने **१९**, खुला गटातील ५ जागेसाठी आवश्यक उमेदवार १५ परंतु समान गुण प्राप्त झाल्याने **२०** व जाहिरातीनुसार १ जागा अपंग उमेदवारासाठी राखीव असल्याने उपलब्ध **२** अशा एकूण ५० उमेदवारांना दि. २४/०५/२०१३ रोजी मा. सेवक निवड समितीपुढे मुलाखतीस बोलविण्यात आले.

**''फार्मासिस्ट ''वर्ग - क या पदाची विहित शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे आहे.**
**डी.फार्मसी उत्तीर्ण, पाच वर्षांचा कामाचा अनुभव**

दि. २४/०५/२०१३ रोजी मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांच्या अध्यक्षतेखाली मा. सेवक निवड समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) - अध्यक्ष
२. मा. आरोग्य प्रमुख - सदस्य
३. मा. सह.महापालिका आयुक्त (मुलेप) - सदस्य
४. मा. उप आयुक्त (ज) - सदस्य
५. मा. अधिक्षक अभियंता (पाणीपुरवठा) - सदस्य

मा.सेवक निवड समितीचे निरिक्षक म्हणून उपस्थित राहणेबाबत खालील कार्यालयांस पत्राने कळविण्यात आलेले होते.

१) मा.असिस्टंट डायरेक्टर युनिव्हर्सिटी एम्लॉयमेंट अँड सेल्फ एम्लॉयमेंट इन्फर्मेशन अँड गाईडलाईन ब्युरो,पुणे विद्यापीठ कॅम्पस,गणेशखिंड रोड,पुणे ४११ ००७

२) मा.प्रकल्प अधिकारी,आदिवासी विकास प्रकल्प,घोडेगाव,ता.आंबेगाव, जि.पुणे - ४१२४०८

३) मा. प्रादेशिक उपआयुक्त समाज, कल्याण,पुणे - ३७

तथापि उपरोक्त कार्यालयाकडील एकही अधिकारी निरिक्षक म्हणून उपस्थित नव्हते.

"फार्मासिस्ट "वर्ग -क या पदासाठी लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांनुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार केली.त्या यादीतील गटनिहाय गुणानुक्रमे ५० उमेदवारांच्या दि.२४/०५/२०१३ रोजी मुलाखती आयोजित करण्यात आल्या. मा. सेवक निवड समितीने उपस्थित सर्व ५० उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

<u>"फार्मासिस्ट "वर्ग - क पदाची दि.३१/०१/२०१३ रोजीची रोस्टर स्थिती खालीलप्रमाणे.</u>

एकूण जागा - ८५ प्रत्यक्ष नेमणूक -७४ रिक्त जागा ड्ढ ११

| तपशील | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आवश्यक आरक्षण | ११ | ६ | २ | २ | ३ | २ | २ | १६ | ४१ | ८५ |
| प्रत्यक्ष नेमणूक | १० | ५ | ३ | २ | २ | १ | २ | १३ | ३६ | ७४ |
| अनुशेष | १ | १ | - | - | - | १ | - | ३ | ५ | ११ |

सदर रिक्त जागा भरणेसाठी सामाजिक व समांतर आरक्षण पुढील प्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे.

पि/१५

## समांतर आरक्षणाचा तक्ता

| संवर्ग | रिक्त जागा | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३०% | खेळाडू ५% | अपंग ३% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | माजी सैनिक १५% | अंशकालीन १०% | एकूण ७०% |
| अजा | १ | १ | – | – | – | – | – | – | – | ० |
| अज | १ | १ | – | – | – | – | – | – | – | ० |
| भजड | १ | १ | – | – | – | – | – | – | – | ० |
| इमाव | ३ | २ | १ | – | – | – | – | – | – | १ |
| खुला | ५ | २. २५ | १.५ | – | – | – | – | ०.७५ | ०.५ | २.७५ |
| एकूण | ११ | ७.२५ | २.५ | – | – | – | – | ०.७५ | ०.५ | ३.७५ |

दि. १६/०५/२०१२ रोजी दिलेल्या जाहिरातीमध्ये एकूण १० पदांपैकी १ पद चलनवलन विषयक विकलांगता असणाऱ्या उमेदवारांसाठी राखीव असल्याचे नमूद केले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही.१०९७/प्र.क्र. ३१/९८/१६-अ मंत्रालय, मुंबई – ४०००३२ दि. १६ मार्च १९९९ चे सहपत्र – १ नुसार शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार महिलांकरिता इमाव गटातून १ व खुल्या गटातून २ व माजीसैनिकांसाठी १ व अशंकालीन करिता १ जागा आरक्षित आहे. तथापि एकही माजीसैनिक व अंशकालीन उमेदवाराने अर्ज केलेला नाही. जाहिरातीनुसार १ जागा चलनवलन विषयक विकलांगता असणाऱ्या उमेदवारांसाठी राखीव असून त्यानुसार १ अपंग सेवकाची नेमणूक करणे आवश्यक आहे.

मा. सेवकनिवड समितीने ‘‘फार्मासिस्ट ’’वर्ग –क पदाची सद्य रोस्टर स्थिती, आरक्षण, अनुशेष, समांतर आरक्षण याचा विचार करून ‘‘फार्मासिस्ट ’’वर्ग.–क या पदासाठी खालील उमेदवारांची निवड / अतिरिक्त निवडयादी तयार करण्यास एकमताने शिफारस केलेली आहे. सदर निवड / अतिरिक्त निवडयादी मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेच्या दिनांकापासून १ वर्षासाठी राहील, १ वर्षाच्या कालावधीमध्ये निवड यादीवरील उमेदवार हजर न झाल्यास तसेच सदरचे पद रिक्त झाल्यास आरक्षणानुसार अतिरिक्त यादीवरील उमेदवाराची नेमणूक करण्यात यावी असा निर्णय समितीने एकमताने घेतला आहे.

## निवड यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १ | श्री घोलप कल्पेश जगन्नाथ | अजा |
| २ | श्री सारूक अशोक शहादेव | भजड |
| ३ | श्रीमती सिन्नरकर पुजा संदीप | इमाव (महिला – समांतर आरक्षण) |
| ४ | श्री मुलाणी आशपाक रज्जाक | इमाव |
| ५ | श्री कल्याणकर विनायक शामसुंदर | इमाव |
| ६ | श्रीमती शेलार वृषाली उत्तम | खुला (महिला – समांतर आरक्षण) |
| ७ | श्रीमती लोखंडे विद्या वसंतराव | खुला (महिला – समांतर आरक्षण) |
| ८ | श्री बागल मच्छिंद्र भारत | खुला |
| ९ | श्री तापकीर सिध्देश्वर अशोक | खुला |
| १० | श्री खाडे रघुनाथ पांडुरंग | खुला (अपंग) |

## अतिरिक्त निवड यादी

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | गट |
|---|---|---|
| १ | श्री.कांबळे समीर विजयकुमार | अजा |
| २ | श्रीमती गंबरे कविता शिवदास | भजड |
| ३ | श्रीमती सोनवणे निशीगंधा अरुण | इमाव |
| ४ | श्री मणेर मोहसीन मुबारक | खुला |
| ५ | श्रीमती पानसरे स्वाती बाजीराव | खुला – महिला |

अतिरिक्त उमेदवारांच्या गटनिहाय संख्येबाबत मे. शासनाकडील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिम–२००७/प्र.क्र.४६/०७/१३–अ दि. १९/१०/२००७ मधील परिच्छेद क्र. ८ व ९ मधील तरतुदी नुसार गटनिहाय अतिरिक्त निवड यादी तयार करण्यांत आली आहे.

वरील प्रमाणे सदर सरळसेवा भरती अंतर्गत सामाजिक आरक्षणानुसार अ.क्र. १ ते ९ येथील उमेदवारांची निवड त्या त्या प्रवर्गा अंतर्गत करण्यात आली आहे. तसेच अतिरिक्त निवडयादी अ.क्र. १ ते ५ उमेदवारांची तयार केली आहे. त्यास मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सेवकवर्गृ विभागाने पुढील कार्यवाही करावी असे मा.सेवक निवड समितीने सुचविले आहे.

उपरोक्त क्र. १० या सदरी अपंग (खुला) उमेदवाराची निवड केली आहे. परंतु मुलाखती दरम्यान असे दिसून आले आहे की अपंगासाठी केवळ २ उमेदवार मुलाखतीसाठी होते. जाहिरातीमध्ये अपंगांसाठी १ पदाचा समावेश आहे. १ पदासाठी ५ उमेदवार मुलाखतीसाठी अपेक्षित असतांना फक्त २ उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध झाले. त्यामुळे पुरेशी स्पर्धा झालेली नाही. **अशा परिस्थितीत २ अपंगांपैकी निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती द्यावी अगर सदर पद रिक्त ठेऊन जाहिरात देऊन स्वतंत्रपणे भरावे याबाबत तसेच उपरोक्त १ ते ९ उमेदवारांच्या निवड यादीस व ५ उमेदवारांच्या अतिरिक्त निवड यादीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ क (१) नुसार मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता मिळणेस मा.सेवक निवड समितीने विनंती केलेली आहे.**

मि।९५

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार ,, क्र ४३ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ दिनांक २१/०५/२०११ नुसार चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१२ मधील मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५३ क (१) अन्वये नेमणूक प्राधिकारी म्हणून मा.महापालिका आयुक्त यांना नियुक्तीचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

''फार्मासिस्ट ''वर्ग - क या पदाची प्रचलित वेतनश्रेणी (पे बँड रु. **५२०० ते २०२०० + ग्रेड पे** रु.२८०० + मान्य भत्ते) अशी असल्याने सदर पदांवर मा.महापालिका आयुक्त यांच्या अधिकारात नियुक्ती देणे शक्य आहे.

तरी ''फार्मासिस्ट ''वर्ग - क पद भरणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेस विनंती आहे.

१) **मा.सेवक निवड समितीचे अहवाला नुसार -**

**अ)** अ.क्र. १ ते ९ येथील निवड यादीवरील उमेदवारांची ''फार्मासिस्ट ''वर्ग - क या पदाच्या रिक्त जागांवर नेमणूक करणेस.

ब) अ.क्र.१० येथील निवड केलेल्या अपंग (खुला) या उमेदवाराची रिक्त पदावर नेमणुक करणेस 'X'

अथवा

सदर पद रिक्त ठेऊन जाहिरात देऊन स्वतंत्रपणे भरणेस

क) अ.क्र. १ ते ५ येथील उमेदवारांच्या अतिरिक्त निवड यादीस

२) मा.सेवक निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांचे आज्ञापत्रक मा.अति.महा.आयुक्त (विशेष) यांच्या स्वाक्षरीने प्रसृत करणेस

'X' proposed to be accepted

7/6/2013

उपआयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

10/06

मा.अति.महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

यांचे मार्फत सादर..

महापालिका आयुक्त
ठराव क्र. १/२५९
दिनांक:- १५/०६/१३

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

अति. महापालिका आयुक्त(वि)
कार्यालय आवक क्र. जा/९०७
दिनांक 12 Jun 2013
पुणे महानगरपालिका

आ.प्र.१/१०७६
१२/६/१३

12/06

अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपालिका

अति. महापालिका आयुक्त(वि)
कार्यालय आवक क्र. जा/११०
दिनांक १२/०६/२०१३
पुणे महानगरपालिका

सेवकवर्ग 'क्ष' मान्य

14/6/13

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

सेवकवर्ग विभाग कार्यालय